स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 09–03–2018** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| **2.** | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सदस्य |
| 3. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 4. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 5. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 6. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 7. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 8. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 9. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 10. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 11. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 12. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 13. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. अश्विन मुद्गल, आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 03ः–** **{विद्युत विभाग}** नागपूर शहरातील सार्वजनिक विहीरीवरील म.न.पा. च्या वॉटर पंपाची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करण्याकरीता रू. 30,00,000/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 04ः–** {जाहिरात विभाग} मुंबई करमणूक शूल्क अधिनियम १९२३ व सुधारीत अध्यादेशानुसार विविध मनोरंजन कार्यक्रमाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्यास्त्व प्रशासकीय शुल्काच्या स्वरुपात रु. १,०००/– (रु. हजार फक्त) आकारण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 05ः–** {लोककर्म झोन 07} प्रभाग क्र. 20 (ड) मधील नाईक तलावाचे सौंदर्यीकरणाच्या कामाकरिता प्राप्त सात निविदांपैकी मे. संतोष खरपकर यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 74,99,787/– पेक्षा 10 टक्के कमी दराची रू. 67,49,808/– (रूपये स्रदुष्ट लक्ष एकोणपन्नास हजार आठशे आठ) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 628(A46201373310) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 06ः–** प्रभाग क्र. 19 ब मधील पोथी गल्ली नमकगंज परिसरात {लोककर्म झोन 06} सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकामास्तव प्राप्त 5 निपिदापैकी मे. अमित मोहन कर्णे यांची मूळ प्राकलनिय दरापेक्षा 14.00 प्रतिशतने कमी व नवीन C.S.R. दरांपेक्षा 5.43 प्रतिशतने कमी दराची रु. 29,80,516/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 07ः–** {वित्त विभाग} नागपूर महानगरपालिकेला मोठया भांडवली स्वरूपाच्या________ प्रकल्पाकरीता आवश्यक निधी व शासन निर्णयानुसार मनपा हिस्सा उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने मनपाने नागपूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना पेंच–IVपार्ट– I करीता घेतलेल्या रू 200 कोटीचे जुन्या कर्जा ऐवजी रू 200 कोटी कर्जाचे पुर्नःएकीकरण (Top-Up)करण्यास मंजूरी प्रदान करण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे

नागपूर महानगरपालिकेला मोठया भांडवली स्वरूपाच्या प्रकल्पांकरीता जसे स्मार्ट सिटी प्रकल्प, सिमेंट रस्ते प्रकल्प, शहरातील दिव्यांचे एलइडी दिव्यांमध्ये रूपांतर करणे, अमृत योजना, हुडकेश्वर नरसाळा विकास/पाणी पुरवठा योजना, झोपडपटटी पुर्नवसन अंतर्गत कामे, भांडेवाडी एसटीपी, भांडेवाडी वेस्ट टू एर्नर्जी प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन, मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरीता मनपा हिस्सा व नासुप्रला द्यावयाचे वैधानिक अंशदान इ. करीता आवश्यक निधी व शासन निर्णयाच्या प्रमाणात मनपाचा हिस्सा उपलब्ध करून देणे तसेच शहरातील नागरीकांना चांगली परिवहन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मनपाला मोठया प्रमाणावर तुट सहन करावी लागणार आहे. हया तुटी करीता सुध्दा निधी उपलब्ध करून द्यावयाचा आहे.

नागपूर महानगरपालिकेवर भविष्यातील साधारणतः पुढील 5 ते 7 वर्षात येणाऱ्या वित्तीय दायित्वाचे सविस्तर विवरण खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव/दायित्व प्रकार | रक्कम रू कोटी मध्ये |
|---|---|---|
| 1 | स्मार्ट सिटी प्रकल्पा अंतर्गत मनपाचा 25% हिस्सा (एकूण किंमत रू 2635.11 कोटी ) | 658.78 |
| 2 | सिमेंट रस्ते प्रकल्पाकरीता मनपा हिस्सा अ) फेज – II (शासन +नासुप्र +मनपा हिस्सा प्रत्येकी रू 100 कोटी) ब) फेज– III | 100.00<br>100.00 |
| 3 | शहरातील नागरिकांना चांगली परिवहन सेवा व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी परिवहन व्यवस्थेतील अपेक्षित तुट भरून | 108.00 |

| | | |
|---|---|---|
| | काढणे<br>( दरमहा रू 9 कोटी ×12 महिने ) | |
| 4 | अमृत योजना (जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत चे अपूर्ण प्रकल्प पूर्ण करणे ) ( मनपा हिस्सा 50% ) | 113.35 |
| 5 | हुडकेश्वर–नरसाळा, विकास / पाणी पुरवठा योजना / खडीकरण व डांबरीकरण (राज्य शासन हिस्सा 80% व 20% मनपा हिस्सा अंदाजे) | 25.00 |
| 6 | शहरातील पारंपारिक दिव्यांचे उर्जाक्षम एलइडी पथदिव्यांमध्ये रूपांतर करणे ( दरमहा रू 3.22 कोटी प्रमाणे 3.22X84 EMI= Rs. 270.28 एस्क्रो खाते ) वार्षिक खर्च रू.38.64 कोटी | 270.48 |
| 7 | भांडेवाडी एसटीपी प्रकल्प ( पिवळी नदी + पेरा नदी + नाग नदी)<br>( दरमहा रू 3 कोटी ×12×5 वर्षाकरीता ) | 130.00 |
| 8 | भांडेवाडी ( वेस्ट टू एनर्जी ) प्रकल्प ( 800MLD )<br>( अंदाजे खर्च रू 70 कोटी + ओ ॲन्ड एम चार्जेस रू 20 कोटी ) | 90.00 |

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव / दायित्व प्रकार | रक्कम रू कोटी मध्ये |
|---|---|---|
| 9 | घनकचरा व्यवस्थापन मनपा हिस्सा ( 75% मनपा हिस्सा ) | 211.78 |
| 10 | मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरीता मनपाचा उर्वरित हिस्सा<br>(5%मनपा हिस्सा रू 434 (–वजा) मनपा जमीनीची किंमत रू 361 कोटी) = रू 73 कोटी ( शा. नि. 21 ऑगष्ट, 2014) | 73.00 |
| 11 | नागपूर मनपा कडून नागपूर सुधार प्रन्यासला द्यावयाचे वैधानिक अंशदानाची रक्कम ( मार्च 2016 पर्यंत ) | 52.78 |
| 12 | झोपडपटटी पूर्नवसना अंतर्गत विविध कामाकरीता पूढील 4–5 वर्षात लागणारा आवश्यक निधी | 114.28 |
| | भविष्यात नागपूर मनपावर येणारे एकूण वित्तीय दायित्व | 2047.45 |

वर नमूद वस्तूस्थिती विचारात घेता नागपूर महानगरपालिकेवर भविष्यात पुढील 5–7 वर्षात विविध भांडवली स्वरूपाच्या प्रकल्पांकरीता आवश्यक निधी व शासन निर्णयानुसार मनपाचा हिस्सा यापोटी अंदाजे एकूण रू 2047.45 कोटीचे आर्थीक दायीत्व राहणार आहे. करिता नागपूर मनपाला वर नमूद मोठया भांडवली स्वरूपाच्या प्रकल्पां करीता अत्यंत निकडीच्या परिस्थितीत आवश्यक निधी उपलब्धतेसाठी नागपूर महानगरपालिकेला रू 200 कोटी कर्जाचे पूर्नःएकीकरण (Top-Up ) ( जूने रू 200 कोटी ऐवजी ) करणे अत्यंत गरजेचे आहे.

1) म.न.पा.ने बँक ऑफ महाराष्ट्र कडून नागपूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना पेंच–IV पार्ट– I व इतर प्रकल्पासाठी घेतलेले कर्ज रू. 200 कोटीचे पूर्नःएकीकरण (Top-Up) करणे.

2) नागपूर म.न.पा.ला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 अंतर्गत कलम 109 मधील तरतूदीनुसार कर्जाचे पूर्नःएकीकरण उभारण्यासाठी ऋणपत्रे निर्गमित करून, म.न.पा.ची अचल मालमत्ता सिक्युरिटी म्हणून ठेवून किंवा म.न.पा.ला प्राप्त होणारे कराचे उत्पन्न हॉयपोथिकेट करून करता येईल. सदर प्रकरणी सादर करण्यात येते की, प्रस्तावित कर्ज हे मनपाची अचल मालमत्ता सिक्युरिटी म्हणून ठेवणे धोरणात्मक स्वरूपाची व संवेदनशील बाब असल्यामुळे, प्रस्तावित रू. 200 कोटी कर्जाचे पूर्नःएकीकरण हे प्रचलित पद्धतीनुसार मनपाला

प्राप्त होणारे विविध स्त्रोतापासूनचे उत्पन्न हॉयपोथिकेट करूनच राज्य शासनाचे मंजूरीचे अधीन राहून करणे.

3) नागपूर म.न.पा.ने सदर कर्जापैकी ( दिनांक 31 डिसेंबर, 2017 पर्यंत ) रू. 176.08 कोटी कर्ज मुद्दलची परतफेड केली असून सद्यःस्थितीत रू. 23.92 कोटी कर्ज मुद्दल रक्कम शिल्लक आहे.

4) वर नमूद म.न.पा.ने बँक ऑफ महाराष्ट्र कडून घेतलेल्या रू. 200 कोटी कर्ज मुद्दलाची संपूर्ण परतफेड ही 30 नोव्हेंबर, 2018 पर्यंत होणार आहे.

5) म.न.पा.ला सदर प्रस्तावानुसार रू. 200 कोटीचे पूर्नःएकीकरण (Top-Up) नोव्हेंबर, 2018 पूर्वी करावयाचे झाल्यास रू. 200 कोटीचे पूर्नःएकीकरण कर्जाचे उभारणी करतेवेळी म.न.पा.कडे त्यावेळी शिल्लक कर्ज मुद्दलची रक्कम वजा करून उर्वरीत कर्जाची रक्कम म.न.पा.स प्राप्त होईल.

6) सदर कर्जाचे रकमेचा प्रथम प्राधान्याने नागपूर महानगरपालिकेमार्फत सुरू असलेल्या सिमेंट कॉंक्रीट रस्ते प्रकल्प फेज– II व फेज – III अंतर्गत देयकांचे प्रदानाकरीता व इतर भांडवली स्वरूपाचे प्रकल्पा अंतर्गत देयकांचे प्रदानासाठी उपयोग करणे बंधनकारक राहील. याबाबतची प्रभावी अंमलबजावणी प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, म.न.पा. यांनी करणे आवश्यक आहे.

7) सदर कर्ज रू. 200 कोटी याचा समावेश रू. 200 कोटीच्या जून्या कर्जात पूर्नःएकीकरणाद्वारे (Top-Up) आपोआप होईल.हे कर्ज ज्या प्रयोजनाकरीता घेण्यात
येणार आहे त्याच प्रयोजनाकरीता खर्च करण्यात येईल.

8) हया कर्जाचे पूर्नःएकीकरण असल्याने (Top-Up) परतफेडीकरीता वेगळयाने एस्को खाते उघडण्याची गरज नाही. सदर कर्जाची परतफेड ही पूर्नःएकीकृत रू. 200 कोटी कर्जाचे एस्को खात्यातूनच केली जाईल.

9) सदर कर्जाचे परतफेडीचा कालावधी हा 7 वर्षे म्हणजेच 84 समान हफ्त्यामध्ये राहील.

10) सदर कर्जाचे व्याज व मुद्दलाची परतफेड ही दरमहा करण्यात येईल.

11) हया कर्जाची उचल ही मनपाचे वर नमूद विविध प्रकल्पाकरीता निधी उपलब्धतेची अत्यंत निकड विचारात घेवूनच उचल करण्यात येईल

12) हया व्यतिरिक्त बँकेने व शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रलेविअ यांची राहील.

13) हया कर्ज परतफेडीची व कर्ज रकमेच्या विनियोगाबाबत त्रैमासिक तपासणीची जबाबदारी उपसंचालक (लेखापरिक्षण) यांचेकडे देणे.

14) सदर रू. 200 कोटीचे कर्जाचे पूर्नःएकीकरण करण्यासाठी शासनास लेखापरिक्षित वार्षिक लेखे, म.न.पा.चे सद्यःस्थितीतील बाहय क्रेडीट रेटींग (External Credit Rating of NMC ), कॅश फ्लो स्टेटमेंट, वैधानिक स्वरूपाची देणी निरंक असणे इत्यादी बाबी त्वरीत पुरविणे आवश्यक राहील.

15) सदर कर्जासाठी Moratorium Period कमीत कमी 12 महिने / 1 वर्ष राहील.

16) सदर कर्जाचे व्याजाचा दर Floating / Flexi व MCLR (Marginal cost based Lending Rate ) प्रमाणे राहील.

17) सदर कर्जाकरीता प्रोसेसिंग फी व कोणत्याही प्रकारचे डॉक्युमेंट चार्जेस प्रदान करता येणार नाही.

सदर प्रस्ताव हा आर्थिक बाबींशी संबंधित असल्यामुळे स्थायी समिती व स्थायी समितीचे मंजूरीनंतर महानगरपालिका, महासभेची मंजूरी प्राप्त करावी लागेल. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 मधील कलम 109 अंतर्गत तरतूदीनुसार नागपूर महानगरपालिकेला रू. 200 कोटी कर्जाचे (डिसेंबर, 2017 पर्यंत रू. 176.08 कोटीचा कर्ज मुद्दलाची परतफेड केली असल्याने व रू. 200 कोटी कर्जाची संपूर्ण परतफेड ही 31 ऑक्टोबर, 2018 पर्यंत होणार असल्याने) रू. 200 कोटी कर्जाचे पूर्नःएकीकरण (Top-Up) करण्यास (म.न.पा. रू. 200 कोटी कर्जाचे पूर्नःएकीकरण करतेवेळी जून्या कर्जातील मुद्दल कर्ज वजा करून उर्वरीत रक्कम ) राज्य शासनाची मंजूरी आवश्यक आहे.

सदर कर्ज पुर्णः एकीकरण प्रस्ताव स्थायी समितीचे मंजूरीस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान करते, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 110 नुसार अंतिम मंजुरीकरिता म.न.पा. सभागृहाकडे पाठविण्याची ही स्थायी समिति एकमताने शिफारस करते.

**ठराव क्रमांक 08ः—** {सा.प्र.वि.}

म.न.पा. स्थायी समिति ठराव क्र. 215, दि. 10/06/2016 नुसार सी. सी. रोड फेज—II अंतर्गत नागपूर शहरातील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याचे कामावर देखरेख ठेवण्याकरिता कार्यालयीन आदेश क्र. 103/ओ. ॲन्ड एम. दि. 03/10/2016 अन्वये 11 महिन्यांकरिता मासिक पारिश्रमिक तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या खालील सेवानिवृत्त उप अभियंता यांचा नियुक्ती कालावधी दि. 02/09/2017 रोजी संपुष्टात आल्यामुळे 2 दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि. 06/09/2017 पासून पुढील 6 महिन्याकरिता (दि. 06/09/2017 ते दि. 05/03/2018 पर्यन्त) तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त करण्यात आले. उक्त आदेशान्वये त्यांचा नियुक्ती कालावधी दि. 05/03/2018 रोजी संपुष्टात आल्यामुळे, खालील 3 सेवानिवृत्त उप अभियंता यांची आवश्यकता असल्यामुळे, 2 दिवसाचा तांत्रीक खंड देवून, दि. 08/03/2018 पासून पुढील 3 महिन्याकरिता मुदतवाढ देण्याचा व याकरिता रू. 3,60,000/— इतका खर्च येण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ. क्र. | कंत्राटी सेवानिवृत्त उप अभियंता | नियुक्ती कालावधी संपुष्टात आल्याचा दिनांक | 2 दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील 3 महिन्याकरिता मुदतवाढ |
|---|---|---|---|
| 1 | श्री. अशोक वासुदेवराव साठवणे | 05/03/2018 | दि. 08/03/2018 पासून पुढील 3 महिन्याकरिता |
| 2 | श्री. रविंद्र प्रभाकर कांडूरवार | 05/03/2018 | दि. 08/03/2018 पासून पुढील 3 महिन्याकरिता |
| 3 | श्री. सुशील नानीकराम टहीलरामानी | 05/03/2018 | दि. 08/03/2018 पासून पुढील 3 महिन्याकरिता |

**ठराव क्रमांक 09ः—** {वित्त विभाग}

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 चे कलम 95 अन्वये नागपूर महानगरपालिकेचे अंदाजपत्रक मा. आयुक्तांद्वारा स्थायी समिती द्वारा मंजुरीकरिता सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सन 2017—2018 चे सुधारित व सन 2018—2019 चे प्रस्तावित अंदाजपत्रक (''अ'' व ''क'') तयार करण्यात आलेले असून स्थायी समितीच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निगम आयुक्त यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले, नागपूर महानगरपालिकेच्या सन 2017—2018 आयुक्त यांचेद्वारे सादर केलेल्या सुधारित व सन 2018—2019 चे प्रस्तावित अंदाजपत्रकात दुरुस्ती व फेरबदल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांना देण्यास ही स्थायी समिति एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच केलेल्या दुरुस्ती व फेरबदलास म.न.पा. महासभेसमोर अंतिम मंजुरीसाठी शिफारस करण्यास्तव पाठविण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, स्थायी समिति यांना देण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 10**</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर

–: